नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ०२/०२/२०२५ (रविवार)सकाळ

---

## मोटर सायकल चोरांना केली अटक. १४ मोटरसायकल जप्त.
## काटोल पोलीसांची कारवाई

पोस्टे काटोल :— दिनांक २८/०१/२५ रोजी फिर्यादी नामे दुर्योधन बाळकृष्ण ठाकरे वय ३८ वर्ष रा.कोहळा ता.काटोल यांनी काटोल पोलीस स्टेशन येथे रिपोर्ट दिली की दिनांक २५/०१/२०२५ फिर्यादीची मोटार सायकल गाडी क्र.एम.एच.४० सी.के ६०८६ कि. ३०००० रू ही घेउन शारदा चौक काटोल येथे उभी करून लावणीचा कार्यक्रम पाहण्यास गेले कार्यक्रम पाहुन परत आले असता मोटार सायकल दिसली नाही शोध घेतला असता मिळुन आली नाही. कोणीतरी अज्ञात व्यक्तीने चोरून नेली. फिर्यादीचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन काटोल येथे ६७/२५ कलम ३०३(२) बी.एन.एस.प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

मा.श्री हर्ष ए. पोददार पोलीस अधिक्षक ,नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने, श्री बापु रोहोम ,उपविभागिय पोलीस अधिकारी,काटोल यांच्या मार्गदर्शनात काटोल पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री निशांत मेश्राम यांनी सदर गुन्हा उघडकीस आणणे कामी एक पथक नेमले.सदर तपास पथकास गुप्त बातमीदारा कडुन माहीती प्राप्त झाली की, आरोपी नामे १. पंकज उर्फ धिरज राजु नारनवरे,वय २२ वर्षे,२. मंगेश ज्ञानेश्वर नारनवरे वय २१ वर्षे दोन्ही रा.रोहणा ता नरखेड जि नागपुर यांनी सदर गुन्हा केला असल्याची माहीती हाती लागल्याने अरोपीतांना ताब्यात घेवुन त्यांच्या कडे सखोल विचारपुर केली असता सदर आरोपी यांनी काटोल पोलीस स्टेशनच्या हददीतुन २ मोटार सायकल चोरी केल्याची माहिती दिल्याने त्या २ मोटार सायकल जप्त करण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर गुन्हयाचे तपासात आरोपींनी नागपुर शहर, अमरावती शहर, अमरावती ग्रामीण, सौंसर, पांढुर्णा मुलताई परीसरातुन १२ मोटर सायकल चोरी केल्याची माहिती दिल्याने १२ मोटार सायकल जप्त करण्यात आल्या आहेत. आरोपीकंडुन अशा एकुण **१४ मोटर सायकल किंमती ३,१८,००० रुपये चा** मुददेमाल जप्त करणत आल्या आहेत. आरोपींनी नागपुर शहर, अमरावती शहर, अमरावती ग्रामीण, सौंसर, पांढुर्णा ,मुलताई पोलीस स्टेशन येथील केलेले गुन्हे उघडकीस आणले आहेत.




पोलीस माहीती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर